**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, JULY-AUGUST, 2021, VOL- 9/66*

# नविन सुधारित दोन वर्षे कालावधीच्या बी. एड. अभ्यासक्रमातील अंतर्गत मुल्यमापन व परीक्षा आयोजन यात प्राध्यापकांना येणा-या अडचणींचा शोध व उपाययोजना

**एम. ए. भदाणे, Ph. D.**
*सहयोगी प्राध्यापक, शिक्षक महाविद्यालय नाशिक*

**Paper Received On:** 21 JULY 2021
**Peer Reviewed On:** 31 JULY 2021
**Published On:** 1 SEPT 2021

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रास्ताविक

पुणे विद्यापीठाने जून 2015 पासून बी.एड. चा अभ्यासक्रम बदललेला आहे. एन.एस.टी.ई.च्या धोरणानुसार सदर अभ्याक्रमात पुणे विद्यापीठाला व महाराष्ट्र शासनाला तसेच इतर राज्यांनाही दोन वर्षाचा करावा लागला आहे. जून 2015 पासुन प्रथम वर्ष सुरु झालेले आहे. सदर अभ्यासक्रम एकूण 2000 गुणांचा असुन प्रथम वर्षासाठी 1000 गुण व्दीतीय वर्षासाठी 1000 गुण अशी विभागणी केली आहे. प्रथम वर्षासाठीच्या 1000 गुणांपैकी 440 गुण हे अंतर्गत कार्यासाठी व 560 गुण विद्यापीठाच्य वार्षिक परीक्षेला दिलेले आहेत. सैध्दतिक भागावरील प्रत्येक विषयाला एकूण 100 पैकी 20 गुण अंतर्गत कार्यासाठी ठेवलेले असून त्यात तीनकृति अपेक्षीत आहेत. प्रात्यक्षिक कार्य, लेखी अंतर्गत परीक्षा व तीसरी कृती ऐच्छीक असून या महाविद्यालयाने बहुपर्यायी परीक्षा ही तीसरी कृती घेण्याची निश्चीत केलेले आहे.

या तिनही कृती पूर्ण करुन घेतांना तसेच त्यांचे मूल्यमापन करतांना प्राध्यापकांना काही अडचणी येतात असे संशोधकाला त्यांच्याशी झालेल्या चर्चेतुन लक्षात आलेले आहे. संशोधक महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी (CEO) असल्याने संपूर्ण अंतर्गत कार्याचे, प्रात्यक्षिकांचे व इतर कार्यांचे मूल्यमापन करतांना अडचणी शोधणे व त्या कमी किंवा नाहीशा करण्यासाठी सोडवण्यासाठी उपाययोजना करणे व सूचवणे संशोधकाला आवश्यक वाटले होते.

## संशोधन समस्या विधान

नविन सुधारित दोन वर्षे कालावधिच्या बी.एड्. अभ्यासक्रमातील अंतर्गत मूल्यमापन व परीक्षा आयोजन यात प्राध्यापकांना येणा-या अडचणींचा शोध व उपाय-योजना
(शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक संदर्भात)

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**संशोधन समस्येचे स्पष्टीकरण**

पुणे विद्यापीठाने जून 2015 पासुन सुरु केलेल्या नवीन सुधारीत दोन वर्षे कालावधीच्या बी.एड्. अभ्यासक्रमातील प्रथम वर्षाच्या अंतर्गत मूल्यमापन करतांना शिक्षणशास्त्र महाविद्यालय नाशिक येथील प्राध्यपकांना येणा-या अडचणींचा शोध व उपाययोजना तसेच वार्षिक परीक्षेच्या नियोजन व आयोजनात प्राध्यपकांना येणा-या अडचणींचा शोध घेऊन त्या कमी करण्यासाठी काही उपाय-योजना सुचविणे.

**संशोधनातील पारिभाषिक संज्ञांच्या व्याख्या**

**अ) संकल्पनात्मक व्याख्या – (conceptual definitions)**

**1) बी.एड्. अभ्यासक्रम** – एन.सी.टी.ई. ने आकृतीबंध केलेला पुणे विद्यापीठाने तयार केलेला व महाराष्ट्र शासनाने स्वीकारलेला शिक्षक होण्यासाठीचा प्रशिक्षण अभ्यासक्रम

**2) अंतर्गत मूल्यापन** –विद्यापीठाने ठरवलेल्या अभ्यासक्रमानाचे महाविद्यालयाने केलेले सर्वकश सातत्यपूर्ण केलेले मूल्यमापन.

**3) वार्षिक परीक्षा** – पुणे विद्यापीठाने बी.एड्. अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्षाच्या शेवटी विद्यापीठ स्तरावर आयोजित केलेली परीक्षा.

**4) प्राध्यापक** – पुणे विद्यापीठ व महाराष्ट्रशासन यांनी ठरविलेल्या निकषांनी बी.एड्. अभ्यासक्रम शिक्षणासाठी नेमणूक केलेले प्राध्यापक

**ब) कार्यात्मक व्याख्या (Operational definitions)**

**1) अंतर्गत मुल्यमापन** – शिक्षणशास्त्र महाविद्यालयात नाशिक, येथील बी.एड्. अभ्यासक्रमातील प्रथम वर्षाचे सर्व तीनही कृतींचे प्राध्यापकांनी केलेले मूल्यमापन.

**2) प्राध्यापक** – शिक्षणशास्त्र महाविद्यालयात नाशिक, येथील बी.एड्. प्रथम वर्षाला अध्यापन व अंतर्गत मूल्यमापन करणारे प्राध्यापक.

**3) वार्षिक परीक्षा** – पुणे विद्यापीठाने शिक्षणशास्त्र महाविद्यालयात नाशिक या केंद्रावर घेतलेली बी.एड्. प्रथम वर्षाची परीक्षा.

**संशोधनाची उद्दीष्ट्ये**

1) बी.एड्. प्रथम वर्ष अभ्यासक्रमातील अंतर्गत मूल्यमापनात प्राध्यापकांना येणा-या अडचणींचा शोध घेणे.

2) बी.एड्. प्रथम वर्ष अभ्यासक्रमाच्या वार्षिक परीक्षेच्या कामात प्राध्यापकांना येणा-या अडचणींचा शोध घेणे.

3) बी.एड्. प्रथम वर्ष अंतर्गत मूल्यमापन व वार्षिक परीक्षा यात येणा-या अडचणी सोडवण्यासाठी उपाय-योजना सूचविणे.

**संशोधनाची गृहितके**

1) बी.एड्. प्रथम वर्ष अभ्यासक्रमातील अंतर्गत मुल्यमापन करतांना प्राध्यापकांना अडचणी येतात.

2) बी.एड्. प्रथम वर्ष अभ्यासक्रमाच्या वार्षिक परीक्षा नियोजन व आयोजनात प्राध्यापकांना अडचणी येतात.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

3) बी.एड्. प्रथम वर्ष अभ्यासक्रमाच्या अंतर्गत मूल्यमापन व वार्षिक परीक्षा यात येणा-या अडचणी कमी झाल्यास अंतर्गत मूल्यमापन व वार्षिक परीक्षा नियोजन-आयोजन परिणामकारक होईल.

**संशोधकांची कार्यपध्दती**

**a) संशोधन, पध्दती** – सदर संशोधनासाठी संशोधकाने समस्येचे स्वरुप उद्दिष्टये यांचाविचार करुन वर्णनात्मक सर्वेक्षण या संशोधन पध्दतींचा अवलंब केला आहे.

**b) जनसंख्या व नमुना** – पुणे विद्यापीठाच्या संलग्न असलेले सर्व महाविद्यालये (120) यांतील प्राध्यापक जनसंख्या म्हणून असतील तर शिक्षणशास्त्र महाविद्यालय नाशिक येथील जनसंख्या म्हणून असतील तर शिक्षणशास्त्र महाविद्यालय नाशिक येथील प्राध्यापक नमुना म्हणून निवड केली आहे.

c) संशोधक साधने – सदर संशोधनासाठी प्रश्नावली, मुलाखती व निरीक्षण या साधनांचा वापर केला आहे.

**d) संख्याशास्त्रीय विश्लेषण तंत्रे** – सदर संशोधनासाठी संशोधकाने केंद्रीय प्रवृत्तीच्या सरासरी म्हणजे मध्यमान या परिमाणाचा उपयोग केला आहे.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा**

**a) व्याप्ती**

1) सदर संशोधनासाठी बी.एड्. अभ्यासक्रमातील प्रथम वर्षाच्या सर्व विषयांच्या अंतर्गत मूल्यमापनाचा समावेश केलेला आहे.

2) प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमातील सर्व सैध्दतिक भागावरील सर्व कृतींचा व प्रात्यक्षिकांचा यातविचार केलेला आहे.

3) सदर संशोधनात शिक्षणशास्त्र महाविद्यालयात, नाशिक येथील सर्व प्राध्यपकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

**b) मर्यादा**

1) सदर संशोधनात फक्त प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमाच्या अंतर्गत मूल्यमापन व प्रथम वर्ष वार्षिक परीक्षा यांचा समावेश केलेला आहे.

2) सदर संशोधन हे  शिक्षणशास्त्र महाविद्यालय नाशिक येथील प्राध्यापकांचाच विचार केलेला आहे.

3) सदर संशोधन हे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक पुरते मर्यादित आहे.

**माहिती वर्गीकरण,विश्लेषण व अर्थनिर्वचन** – शिक्षणशास्त्र महाविद्यालय नाशिक येथील सर्व 18 प्राध्यापकांना 33 प्रश्न असलेली प्रश्नावली दिली. त्या प्रश्नावलीत बध्द प्रश्न, बहुपर्यायी प्रश्न, मुक्त प्रश्न असे सर्व प्रकारचे प्रश्न होते. तसेच काही प्राध्यापकांच्या मुलाखती घेतल्यात आलेल्या माहितीवरुन वर्गीकरण करुन टेबल तयार केले. माहितीचे विश्लेषण केले व अर्थनिर्वचन नोंदवले त्या अर्थनिर्वचनावरुन निष्कर्ष काढलेत तसेच  शिफारशी म्हणजेच उपाय-योजना  सुचवल्यात.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**प्रथमवर्ष बी.एड्. अंतर्गत मूल्यमापन करतांना साधारणपणे खालीलपैकी कोणत्या अडचणी जाणवतात या प्रश्नाला प्रतिसादकांनी दिलेला प्रतिसाद व त्याची सरासरी दाखविणारे कोष्टक –**

| **अ.क्र.** | **अडचणी** | **प्रतिसादक 18 पैकी** | **सरासरी %** |
|---|---|---|---|
| 1 | प्रात्यक्षिके समजावून सांगण्यासाठी वेळ मिळत नाही. | 15 | 83 |
| 2 | प्रात्यक्षिके करुन घेण्यासाठी वेळापत्रकात वेळ दिलेली नाही. | 18 | 100 |
| 3 | प्रात्यक्षिकांची सविस्तर माहिती व व्याप्ती दिलेली नाही. | 16 | 89 |
| 4 | प्रात्यक्षिके पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना वेळ कमी पडतो. | 15 | 83 |
| 5 | विद्यार्थ्यांच्या पूर्व ज्ञानाच्या तुलनेत प्रात्यक्षिके अवघड आहेत. | 12 | 67 |
| 6 | विद्यार्थी एकमेकांची कॉपी करतात. | 18 | 100 |
| 7 | प्राध्यापकांना प्रात्यक्षिकांच्या orientationची आवश्यकता असते. | 17 | 94 |
| 8 | प्रात्यक्षिके तपासण्यासाठी प्रमाति पडताळ सूची नाही. | 18 | 100 |
| 9 | प्राध्यापकांना प्रात्यक्षिके तपासण्यासाठी वेळ कमी पडतो. | 16 | 89 |
| 10 | प्राध्यापकांकडे विद्यार्थ्यांना दाखवण्यासाठी आदर्श प्रात्यक्षिके नमुना उपलब्ध नाही. | 18 | 100 |
| 11 | प्रात्यक्षिके तपासतांना व्यक्तिनिष्टता येते. | 14 | 78 |
| 12 | विद्यार्थी प्रात्यक्षिकांची मुद्देसुद मांडणी करत नाहीत. | 12 | 67 |

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**पूर्वपरीक्षण वार्षिक परीक्षेच्या कामात खालीलपैकी कोणत्या अडचणी येतात या प्रश्नाला प्रतिसादकांनी दिलेला प्रतिसाद व त्याची सरासरी दाखवणारे कोष्टक –**

| अ.क्र. | अडचणी | प्रतिसादक 18 पैकी | सरासरी % |
|---|---|---|---|
| 1 | पूर्व परीक्षेच्या प्रश्नपत्रिका काढण्यासाठी पूरेसा वेळ मिळत नाही. | 17 | 94 |
| 2 | प्रश्न पत्रिका काढण्यासाठी प्राध्यापकांमध्ये योग्य सहकार्य व समन्वय यांचा अभाव. | 12 | 67 |
| 3 | पूर्व परीक्षेचे पेपर तपासण्यासाठी वेळ कमी पडतो. | 17 | 94 |
| 4 | विद्यार्थ्यांना वैयक्तीक मार्गदर्शन करता येत नाही. | 16 | 89 |
| 5 | बहुपर्यायी प्रश्न पत्रिका काढण्यासाठी प्रश्नपेढी उपलब्ध नाही. | 18 | 100 |
| 6 | वार्षिक परीक्षेच्यावेळी बारकोड स्टीकर लावण्यात अडचणी येतात. | 16 | 89 |
| 7 | हॉलो क्राफ्ट स्टीकर लावण्यात अडचणी येतात. | 12 | 67% |
| 8 | विद्यार्थ्यांची सही घेऊन स्टीकर चिटकवतांना गोंधळ होतो. | 14 | 78% |
| 9 | एच्छिक विषयांच्या पेपरच्या वेळी अधिक अडचणी येतात. | 16 | 89% |
| 10 | उपस्थिती फॉर्म भरण्यात अडचणी येतील. | 16 | 89% |

**निष्कर्ष**

1) प्रात्यक्षिक करुन घेण्यासाठी वेळापत्रकात वेळ दिलेला नाही.
2) विद्यापीठाने प्रात्यक्षिकांची सविस्तर माहिती व व्याप्ती दिलेली नाही.
3) विद्यार्थी प्रात्यक्षिकांची एकमेकांची कॉपी करतात.
4) प्राध्यापकांना प्रात्यक्षिकांची सैध्दांतिक माहितीचे मार्गदर्शन मिळत नाही.
5) प्रात्यक्षिक तपासण्यासाठी प्रमाणित पडताळा सूची उपलब्ध नाही.
6) प्राध्यापकांना प्रात्यक्षिके तपासण्यासाठी वेळ कमी पडतो.
7) प्राध्यापकांकडे विद्यार्थ्यांना दाखवण्यासाठी आदर्श प्रात्यक्षिक नमुना उपलब्ध नाही.
8) प्रात्यक्षिके तपासतांना व्यक्तीनिष्टता येते.
9) पूर्व परीक्षांच्या प्रश्न पत्रिका काढण्यासाठी पूरेसा वेळ मिळत नाही.
10) पूर्व परीक्षेचे पेपर तपासण्यासाठी वेळ कमी पडतो.
11) विद्यार्थ्यांना वैयक्तीक मार्गदर्शन करता येत नाही.
12) बहुपर्यायी प्रश्न तसेच इतर प्रश्नांची प्रश्नपेढी उपलब्ध नाही.
13) बारकोड व हॉलो स्टीकर लावण्यासाठी पूरेसे मार्गदर्शन मिळत नाही.
14) पाच ब्लॉकसाठी एक अधिक ज्युनिअर मार्गदर्शक मदतनीसाची आवश्यकता भासते.
15) तीस विद्यार्थ्यां ऐवजी 25 विद्यार्थ्यांचाच एक ब्लॉक असावा.

## शिफारशी

1) प्रात्यक्षिके समजावून सांगण्यासाठी वेळापत्रकातच वेळ दयावा.
2) विद्यापीठाने प्रत्येक विषयाच्या सर्व प्रात्यक्षिकांची सविस्तर शैक्षणिक माहिती व व्याप्ती दयावी.
3) प्रात्यक्षिके पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांनाही विशिष्ट वेळ दयावा.
4) शक्यतोवर विद्यार्थ्यांच्या गटा-गटात वेगवेगळे प्रात्यक्षिके दयावीत म्हणजे कॉपी करण्याचे प्रमाण कमी होईल.
5) सर्व प्रात्यक्षिकांचे प्राध्यापकांसाठी orientation घ्यावे.
6) प्रात्यक्षिके तपासण्यासाठी आदर्श प्रमाणित पडताळा सूची विद्यापीठाने पुरवावी.
7) प्रात्यक्षिके तपासण्यासाठी प्राध्यापकांना विशिष्ट वेळ दयावा.
8) महाविद्यालयात सर्व प्रकारच्या प्रश्नांची प्रश्नपेढी असावी.
9) पूर्व परीक्षेच्या प्रश्न पत्रिका काढण्यासाठी पूरेसा वेळ दयावा.
10) तसेच पेपर तपासण्यासाठी ही पूरेसा वेळ दयावा.
11) बार-कोड व हॉलो स्टीकर लावण्या संदर्भात महाविद्यालयातील परीक्षा अधिकारी यांनी मार्गदर्शनपर व्याख्यान घेऊन डेमो दयावा.
12) विद्यापीठाने 30 विद्यार्थ्यांऐवजी 25 विद्यार्थ्यांचा एक ब्लॉक करण्यास मान्यता दयावी.
13) दहा ब्लॉक ऐवजी पास ब्लॅकसाठी Reliever ची सोय असावी.

अशा प्रकारे महाविद्यालयाने व विद्यापीठाने संशोधकाने सूचवलेल्या उपाय-योजना आंमलात आणल्यास अंतर्गत मूल्यमापन व परीक्षा कामातील अडचणी कमी होऊन परीक्षा व अंतर्गत मूल्यमापन परीणामकारक होण्यास मदत होईल.

## संदर्भ

*एम. ए. भदाणे (2016-17) नवीन सुधारित दोन वर्ष कालावधिच्या बी.एड्. अभ्यासक्रमातील अंतर्गत मूल्यमापन व परीक्षा आयोजन यात प्राध्यापकांना येणा-या अडचणींचा शोध व उपाय-योजना. ( शिक्षणशास्त्र महाविद्यालय नाशिक संदर्भात) - कृतीसंशोधन- अप्रकाशित.*
*सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रथम वर्ष बी.एड्. (2015) अभ्यासक्रम.*
*टिळक महाविद्यालय पुणे बी.एड्. प्रथम वर्ष अंतर्गत मूल्यमापन मार्गदर्शिका (2016)*
*बापट भा. गो. (1997) शैक्षणिक संशोधन, पुणे नुतन प्रकाशन.*
*पारसनीस हेमलता व देशपांडे लिना (1994) शैक्षणिक कृती संशोधन, पुणे, नुतन प्रकाशन.*
*Best J. W. & Kahan J. V. (1989) 'Research in education', 6th Edition, New Delhi, Prentice Hall of India Private Ltd.*